अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# आदर्श गैरव्यवहाराचा ७ कोटींचा भुर्दंड

आदर्श इमारतीच्या गैरव्यवहाराबाबत अजुनही निकाल लागलेला नाही. परंतु गैरव्यवहाराच्या चौकशीवर जर कोट्यवधींचा खर्च होत असेल तर ते नुकसान कोणी सोसायचे? सरकारी वकील, चौकशी समिती, चौकशी आयोग, त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग असा मोठा लवाजमा सध्या आदर्श इमारतीच्या घोटाळ्याच्या चौकशी कामात गुंतलेले आहेत. आतापर्यंत चौकशीच्या कामावर तब्बल सात कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. सात कोटी ही रक्कम थोडीथोडकी नाही. मुळात हा सगळा भुर्दंड सरकारने तरी का सोसायचा? कारण सरकार काही स्वत:च्या खिशातून पैसे देत नाही. शेवटी लोकांनी सरकारला दिलेल्या करामधून ही खिरापत वाटली जाते. म्हणजे गैरव्यवहार करणाऱ्यांनी सगळे नियम धाब्यावर बसवून वाट्टेल तसे धंदे करायचे आणि त्यांच्या चौकशीचा खर्च सरकारने करायचा हा उफराटा प्रकार ठरतो. हा केवळ अण्यापारेसु व्यापार नाही तर सामान्य माणासाच्या डोक्यावर लादलेला भुर्दंड ठरतो. ज्या आदर्श इमारत घोटाळ्याने सगळा देश हादरला होता. कारगिल युद्धात हुतात्मा झालेल्या कुटुंबीयांच्या नावे दक्षिण मुंबईतला हा मोक्याचा भुखंड हडप केला गेला. या इमारतीत सगळी बडी धेंडे अडकलेली आहेत. राजकीय प्रभाव असणारे अनेक नेते त्यात अडकलेले आहेत. आता त्यांनी केलेला गैरव्यवहार तपासण्यासाठी ८ जानेवारी २०११ रोजी माजी न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग नेमला गेला. आयोगाने १८ एप्रिल २०१३ रोजी आपला अंतिम अहवालही सादर केला. परंतु अजूनही या अहवालावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही. कोणालाही शिक्षा झालेली नाही. थोडक्यात सांगायचे तर या सर्वांत अडकलेल्या एकाही बड्या धेंड्याला शिक्षा होऊ नये असा राजकीय प्रयत्न सुरू आहे. आतादेखील या चौकशीवर झालेली तब्बल सात कोटींची उधळपट्टी याच सरकारी आणि राजकीय बेफिकीरीतून केली गेली. चौकशी आयोगाचे काम एकूण ८४२ दिवस चालले म्हणजे रोज ८३ हजार ६०५ रुपयांचा खर्च सुरू होता. चौकशी आयोगासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर पगारापोटी १ कोटी ८८ लाख खर्च झाले. तर टेलिफोन, वीज आदिंवर तब्बल ७ लाख ९९ हजार खर्ची पडले. याशिवाय इतर खर्च म्हणून सुद्धा ३ कोटी ९६ लाख मोजावे लागले. खर्चाची ही आकडेवारी पाहिल्यावर सरकारी कारभारात जनतेचा पैसा कसा पाण्यासारखा खर्च केला जातो यावर चांगलाच प्रकाश पडतो.

### जनतेवर भुर्दंड

सरकारी व्यवहारात एखाद्या चांगल्या कामासाठी पैसा मागायला गेलात तर तो मिळणार नाही आता चुकून एखाद्या मदतकार्यात असा पैसा वापरला गेला तर त्यावर टीकेची झोड उठवली जाईल. खर्च झालेल्या पैशाचा हिशोब मागितला जाईल. पण इथे सरकारच्याच आशीर्वादाने झालेल्या गैरकारभाराच्या चौकशीसाठी सरकारी कृपेनेच एवढी प्रचंड उधळपट्टी झालेली आहे. ज्याची केवळ एकच प्रत सरकारच्या ताब्यात आहे. ६९१ पानांचा अहवाल आज जवळपास धुळखात पडला आहे. म्हणजे सात कोटी खर्च करून सरकारने काय मिळवले. हा अहवाल असा काही गोपनीय ठेवला गेला आहे की त्यातला निष्कर्षांबाबत सरकारला कोणतीही घाई नाही. खरे तर अहवाल सादर होऊन पुढच्या पंधरा दिवसांत संबंधितांच्या कारभाराची चौकशी व्हायला हवी होती किंवा त्यात ज्यांच्यावर गंभीर आरोप आहेत अशांवर आरोपपत्र ठेवले जायला हवे होते. आरोपपत्राचे तर सोडाच परंतु, त्यात अडकलेल्या अतिमहत्त्वाच्या लोकांकडे कोणी बोटही दाखवू नये अशी व्यवस्था सरकारने केली आहे. सहा महिने उलटूनही अहवाल सार्वजनिक केला गेलेला नाही. आम्हाला तर असे वाटते की ज्या पद्धतीने अहवाल दडपण्याचा प्रयत्न होत आहे तो पाहिल्यावर सरकारला त्यातल्या कोणावरही कठोर कारवाई व्हावी अशी इच्छाच दिसत नाही. विशेषत: यात अडकलेल्या राजकीय नेत्यांच्या नखालीही धक्का लागू नये आणि त्यांच्या कडक इस्त्रीच्या कपड्यांना जरासाही धक्का लागू नये याची काळजी सरकारच घेत आहे. म्हणजे गैरव्यवहाराची चौकशी करण्याऐवजी आलेला अहवाल दडपण्यासाठी सरकारने हा खर्च केला की काय? अशी शंका वाटू लागते.

### फ्लॅटधारकांकडून खर्च वसूल करा

आदर्श घोटाळ्याचा गैरव्यवहार ही एक राजकीय कारस्थानी चाल आहे. चौकशीची सगळी नाटके पूर्ण केली जातील आणि त्यात वेळ घालवून हे प्रकरण जुने झाले की त्यातला लोकांना पूर्ण अभयदान दिले जाईल. ३२ मजल्याची इमारत भ्रष्टाचाराच्या पायावर उभी राहाते आणि त्यातल्या गैरकारभाराला संरक्षण दिले जाते. हा प्रकारच धक्कादायक ठरतो. कालांतराने ही सगळी इमारत अधिकृत होईल. त्यात ज्यांना-ज्यांना फ्लॅट वाटप झाले आहेत. ते तितक्याच दिमाखाने तिथे राहायला जातील. गैरव्यवहारावर खर्च करून तो दडपण्याचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला जाईल. याबाबत राज्यातला विरोधी पक्षदेखील आक्रमक दिसत नाही. कारण त्यांच्या पक्षातीलही काही लोक त्यात अडकलेले आहेत. शेवटी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्या संगनमताने ज्याला एक राष्ट्रीय गुन्हा म्हणता येईल, तो माफ करण्याचा अभूतपूर्व प्रकार घडेल. याबाबत न्यायालयाने सुद्धा कठोर भूमिका घेतली तर सर्व राजकारण्यांचे धाबे दणाणू शकतील. सरकार जी चालढकल करीत आहे. त्याचा जाब न्यायालयाने विचारला पाहिजे. आमची तर अशी मागणी आहे. आदर्श घोटाळ्याच्या गैर व्यवहाराच्या चौकशीवर जो सात-आठ कोटींचा खर्च झाला आहे तो सगळा या इमारतीत ज्यांच्या ज्यांच्या नावे फ्लॅट आहेत त्यांच्याकडून व्याजासकट वसूल केला पाहिजे. त्यांच्या गैरकृत्यांचा भार जनतेने किंवा सरकारने सहन करण्याची काहीच गरज नाही. जोपर्यंत अशी कठोर भूमिका घेतली जात नाही तोपर्यंत ही सरकारी उधळपट्टी थांबणार नाही. आदर्श इमारत घोटाळा ही देशाच्या प्रतिमेवरचा डाग असणारी घटना आहे. त्या गैरव्यवहाराची तड लागलीच पाहिजे.